# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०७/०७/२०२२ (गुरूवार)**

**(दुपार)**

---

### मोटरसायकल चोरी

**१) पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील वार्ड नं. ३ बालाजी लॉन जवळ सावनेर येथे दिनांक ०५/०७/२०२२ चे १९.०० वा. ते दि. ०६/०७/२०२२ वा. ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— मंगेश हरीभाउ पटे, वय ३९ वर्ष, रा. वार्ड नं. २ अवधुतवाडी सावनेर यांचा मोठा भाउ निलेश हरीभाउ पटे यांची एमएच—४०/जी— २२३६ क्रमांकाची काळया रंगाची स्प्लेन्डर कंपनीची मोटरसायकल ही आर्कीटेक पटे असोशिएट ऑफीस बालाजी लॉनजवळ त्या ऑफीस मध्ये घेवुन गेले. ती गाडी फिर्यादी यांनी बालाजी लॉनच्या बाजुला उभी करून ठेवली व ऑफीसमध्ये गेले. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादी किंमती ५,०००/—रू. ची मोटरसायकल अज्ञात आरोपीने चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार राजेन्द्र यादव मो. ९४२३६०२९८७ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. बोरी** :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील मोजा बुटीबोरी स्मार्ट पांइट दुकान येथे दिनांक ०३/०७/२०२२ चे १९.४५ वा. सुमारास फिर्यादी नामे— दिनेश राजकुमार राजपांडे, वय ३६ वर्ष रा. श्रीकृष्ण नगर प्लॉट नं. ६१, बुटीबोरी याने त्याची एम एच— ४०/बीपी— ११५१ क्रमांकाची होन्डा लिओ काळया रंगाची मोटरसायकल ही स्मार्ट पाइंट बुटीबोरी दुकानाचे समोर पार्कीग मध्ये लावुन साहीत्य खरेदी करण्याकरीता गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींची कि. २०,०००/— रू. मोटरसायकल पार्कीग मधुन चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास नापोशि अतुल भोंडे मो.नं. ८२०८१०१७८५ हे करीत आहे.

### गोवंश चोरी

**पो.स्टे. कुही** :— अंतर्गत ०८ कि.मी. अंतरावरील मौजा ससेगाव येथे दिनांक ०५/०७/२०२२ चे १९.०० वा. ते दि. ०६/०७/२०२२ वा. ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— विलास सदाशिव वान्दे, वय ४८ वर्ष, रा. ससेगाव, ता. कुही यांचे गोठयामध्ये बांधलेले ०३ बैल किंमती ४०,०००/—रू. तसेच त्यांच्या गावातील हरीभाउ चिंधुजी बुरडकर यांचे गोठयातील ०२ पांढ—या रंगाची गाय व ०१ पांढ—या रंगाचा बैल किं. ३५,०००/—रू. व भाउराव अंकुश बुरडकर यांचा पांढ—या रंगाचा गोरा किं. १०,०००/—रू. असे एकुण ०७ जनावरे एकुण किंमती ८५,०००/— रू. चे अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार विजय कुमरे ९८२३९७१४५३ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील मौजा तिलक चौक ईतवारीपेठ उमरेड येथे दिनांक ०६/०७/२०२२ चे ०७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— राम काशीनाथ देशमुख, वय ३६ वर्ष रा. ईतवारीपेठ राममंदीर जवळ उमरेड यांचे टिळक चौकात नविन दुकानाचे ०३ मजली बांधकाम चालु असून यातील डेकोरेट करणे बाकी आहे. ०८ दिवसापुर्वी नागपूर येथून गोविंद इलेक्ट्रीकल या दुकानातुन ईलेक्ट्रीक फिटींग करीता वायर आणलेले होते. ते संपुर्ण वायर दुसऱ्या माळयावर ठेवलेले होते. ईलेक्ट्रीक फिटींग करीता कामावर नागपूरचे कारागीर लोक आहेत ईलेक्ट्रीक फिटींगवाले ०३ मुले हे नवीन दुकानाचे ईलेक्ट्रीक फिटींग करण्याकरीता दुकानाचे शटर उघडले असता त्यांना दुकानाचे दुसऱ्या माळयावर ठेवलेले ईलेक्ट्रीक वायर दिसले नाही. त्यामुळे त्यांनी फिर्यादीला फोन करून माहीती दिली, फिर्यादीने दुकानात जावून पाहीले असता खरेदी करून आणलेले १) ०६ एम.एम चे ४ बंडल, २) ४ एम.एम. चे ०६ बंडल, ३) २१/२ एम.एम. चे ०८ बंडल, ४) १ १/२ एम.एम.चे १२ बंडल ५) १ एम.एम. चे १२ बंडल असे एकुण ४२ वायर बंडल एकुण किमती ५५,०००/—रूपयाचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार आशिष खोडे मो. क्र. ८४११०५२६२८ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. जलालखेडा** — दिनांक ०६/०७/२०२२ चे १२.०० वा. चे सुमारास पो.स्टे. जलालखेडा हद्दीत फिर्यादीयांची १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री मनोज शेंडे मो.क्र. ९६३७५७८७६३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**